# पोलीस उप आयुक्त, शहर वाहतुक शाखा, ठाणे शहर

महाराष्ट्र पोलीस

OW/DCP TRAFFIC THN/ADM/ NOTIFICATION/ 92/2017
पोलीस उप आयुक्त,शहर वाहतूक शाखा,यांचे कार्यालय,तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दिनांक :–16102017
दुरध्वनी क्रमांक 022- 25401056

1279/17
17/10/17

**"वाहतुक नियंत्रण अधिसुचना"**

ठाणे पुर्व, कोपरी भागात हासिजा कॉर्नर येथे फटाका विक्रीचे होलसेल मार्केट असुन सदर ठिकाणी फटाके खरेदी करण्याकरीता मुंबई तसेच उपनगरातुन कोपरी येथे मोठया संख्येने नागरीक त्यांची वहाने घेवुन येत–जात असतात. तसेच ठाणे पुर्व रेल्वे स्टेशन हासिजा कॉर्नर पासून जवळच असल्याने कामगारांची वर्दळ चालु असते. याकरीता कोपरी हासिजा कॉर्नर,स्टेशन परिसरात वाहतुक सुनिश्चित होण्याकरीता आम जनतेच्या सोईसाठी,

महाराष्ट्र शासन गृहविभाग एम.व्ही.ए. –११६/सी.आर/३७/टी.आर. दि.०७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन, मी, अमित का. काळे, पोलीस उप आयुक्त,शहर वाहतूक शाखा, ठाणे शहर खालील प्रमाणे वाहतूक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे:–

१) कोपरी ठाणे पूर्व येथील हासिजा कॉर्नर ते कैलास स्विट्स तसेच हासिजा कॉर्नर, कराची स्विट्स ते संत तुकाराम पथ या रोडवर वाहने उभी करण्यास मनाई (No Parking) करण्येत येत आहे.

२) कोपरी ठाणे पुर्व गावदेवी मंदिर फटाका मार्केट कृष्णा जनरल स्टोअर्स संत तुकाराम पथ या मार्गावर वाहने उभी करण्यास मनाई ( No Parking ) करण्यात येत आहे.

३) ठाणे महानगरपालिका,ठाणे,यांचे मा. बबनराव शिंदे सभागृह ते हासिजा कॉर्नर या मार्गावर रेल्वे कंपाऊंडलगत वाहने उभी (Parking) करण्यास (एका रांगेत) मुभा देण्यात येत आहे.

**सदरची वाहतूक अधिसुचना दि. १७/१०/२०१७ ते दि. २१/१०/२०१७ पावेतो दिवाळी सणानिमीत्त अमलात राहिल.**

सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायरब्रिगेड, रुग्णवाहीका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने यांना लागु राहणार नाही.

( अमित का.काळे )
पोलीस उप आयुक्त,शहर वाहतुक शाखा
ठाणे शहर

प्रति,

जिल्हा प्रसिद्धी अधिकारी, ठाणे

२/– सदरची अधिसुचना प्रसिद्ध करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका,ठाणे

मा. जिल्हाधिकारी,ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे

परिवहन व्यवस्थापक,ठाणे महानगरपालिका,ठाणे, बृहन्मंबई व वसई–विरार महानगरपालिका.

विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे.

पोलीस उपायुक्त, परिमंडळ–१,ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा,ठाणे.

प्रत:– पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे.

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पो.निरी.कोपरी, वाहतूक उपविभाग.

२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.